# महिला सबलीकरण:- राजर्षी शाहू महाराजांचे योगदान

**प्रा. डॉ. सुजाता जगन कराडे.** सहयोगी प्राध्यापक, प्रमुख, समाजशास्त्र श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली

---

**प्रस्तावना**

सबलीकरणाची संकल्पना बहुआयामी सृजनशील संकल्पना आहे. समाजामध्ये वंचित व शोषित घटकांना स्वातंत्र्य, समता आणि न्याय मिळवून देणे. त्यांना सबल करणे म्हणजे सबलीकरण होय. असा घटक म्हणजे जो की, परंपरागत समाज व्यवस्थेमध्ये वर्ग, लिंग आणि धर्म या तीनही प्रकारच्या आधारावर भेदास सामोरे जात असणारा समाज घटक म्हणजे स्त्री होय.

आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक परिवर्तन घडून आले. या परिवर्तनातून सामाजिक संरचनेत बदल झाला पण आज स्त्री जितकी सबल व्हायला हवी होती तितकी ती झाली आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. स्त्रियांचे सबलीकरण व्हावे म्हणून हे भारतीय समाजातील वेगवेगळ्या कालखंडाचा अभ्यास केला तर दिसून येते की, भारतात सबलीकरणासाठी गौतम बुध्दापासून ते आधुनिक काळातील विविध महनीय व्यक्तींनी प्रामाणिक प्रयत्न करून स्त्रीचे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

परिवर्तनाच्या अनुशंगाने स्त्री सबलीकरणाचे पहिले पाऊल महात्मा जोतिबा फुले यांनी उचलेले होते. त्याच पध्दतीने राजांनी राजर्षी शाहू महाराज यांनी जे स्त्रीमुक्तीचे कार्य हाती घेतले. ते कार्य दोन स्तरावर होते असे दिसून येते यापैकीपहिला स्तर म्हणजे स्त्री शिक्षित व्हावी आणि दुसरा स्तर म्हणजे समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण व्हावे. शाहू महाराजांनी याकरिता आपल्या संस्थानांमध्ये स्त्रीविषयी विविध कायदे केले तसेच त्या-त्या अनुशंगाने कृतीशिल कार्यक्रम आखून त्याची अमंलबजावणीदेखील केली. शाहू महाराजांचे स्त्रीमुक्तीचे कार्य २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून स्त्री सबलीकरणास पोषक असेयोगदान दिसून येते.

१९ व्या शतकात सर्व सामान्य स्त्रियांवरची धार्मिक बंधनांचे वर्चस्व व स्त्रियांच्या सामाजिक प्रश्नांची भयानकता अतिशय तीव्र होती. स्त्रियांची या बंधनातून सुटका व्हावी म्हणूनगौतम बुध्द,महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षि धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, नाना शंकर शेठ, ईश्वरचंद्र विद्यासागर व इतरसमाजसुधारकांनी वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या पातळीवर प्रयत्न केले हेमहाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण टप्पे होय. महाराष्ट्रात प्रबोधनाची प्रक्रिया ही स्त्री प्रश्नाच्या अनुषंगाने जे विचार मंथन होत होते ते स्त्री दास्याची समस्या म्हणून तीव्र होत्या.

राजर्षीशाहूमहाराजांनी स्त्रीचा विचार करताना स्त्रीला प्रतिष्ठा आणि समता या तत्वाच्या आधारावर जात, धर्म, आणि पितृसत्तेच्या पारंपरिक जोखंड्यातून स्त्रियांना मुक्त करण्याकरिता कृती कार्यक्रम हाती घेतला आणि स्त्रियांचे मूलभूत प्रश्न वास्तवरुपात मांडले. शाहू महाराजांनी स्त्री विषयक सुधारणा करण्याकरिता स्त्री सबलीकरणाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून स्त्रिया समान व स्वतंत्र आहेत. त्यांच्या दर्जामध्ये बदल झाला पाहिजे याकरिता कायद्याच्या रुपातून स्त्रियांचे सबलीकरण केले, पण आज घटनेने दिलेल्या कायद्यानुसार स्त्रिया त्याचा पुरेपूर वापर करत आहेत का?

**संशोधन समस्या**

शाहू महाराजांनी स्त्री-शिक्षणास प्रोत्साहन देवून नैसर्गिक हक्काबरोबर संरक्षण करणारे कायदे अंमलातआणले,स्त्रीवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केले,स्त्रीयांना संधी देऊन त्यांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न केले आणि स्त्रीयांच्या दर्जामध्ये बदल केला आहे. सदर संशोधनातून स्त्रियांना समानता आहे हे सकारात्मक दृष्टीने पाहणे गरजेचे आहे भारतीय समाजाने लोकशाही पद्धतीचा स्वीकार करून स्त्रियांना संधी देण्यात आली आहे याचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण स्त्रिया या कोणकोणत्या समस्यांना सामोरे जात आहेत कोणकोणत्या व्यवस्थेमध्ये शोषण होत आहे या प्रश्नांचा शाहू महाराज यांच्या काळातील विचार सदर संशोधनामध्ये केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. स्त्री सुधारणाविषयक व शाहू महाराज यांनी केलेल्यास्त्री-उद्धारविषयक कायदे याची पार्श्वभूमी तपासणे.
2. शाहू महाराज यांचास्त्री पुरुष समानता विषयक विचार अभ्यासणे.
3. शाहू महाराज यांनी केलेल्या स्त्री सबलीकरणाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. दुय्यमतथ्य संकलनाकरिता संदर्भ ग्रंथ पुस्तके, मासिकाच्याआधारे निबंधाची मांडणी केलेली आहे.

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये आणि संस्कृतीच्या अनुषंगाने पाहिले तर,स्त्री मुक्ती, स्त्री पुरुष समानता हे ऐरणीवरचे प्रश्न शाहू महाराजांनी हाती घेतले. महाराजांच्या विचारांचे सूत्र हे स्त्री सबलीकरणाच्या दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल आहे समता शोषण मुक्ती आणि स्त्री मुक्ती हे प्रश्नास,कायद्याचे रुप दिले. स्त्रियांना मूलभूत हक्काची जाणीव करून दिली. स्त्रियांच्या कार्यक्षेत्रास क्षमतेला न्याय आणि संधी देऊन स्वातंत्र्य,समता आणिन्याय देण्याचा प्रयत्न केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत हिंदू कोड बिल अंतर्गत स्त्रियांना प्रगतीचे मार्ग मोकळे करून दिले, ते एक प्रकारचे स्त्रियांचे संरक्षण कवच म्हणता येईल. स्त्रीयांचेकायद्याद्वारे व उपक्रमाद्वारे खऱ्या अर्थाने सबलीकरण झालेहे जरी दिसून येत असले तरी कायदे वंचित स्त्रियांपर्यंत पोहोचले आहेत का हे पाहणे गरजेचे आहे.

भारतीय समाजात पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांच्या वर अन्याय,अत्याचार होत होते, रूढी परंपरांनी स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणुक दिली जात होती,स्त्री शूद्राति शूद्रमानली जात होती. स्त्री ही शूद्र आणि दुय्यम नाही,स्त्रीवर्गासंबंधीचे विचार हे स्त्रीमुक्ती आणि मानव मुक्तीचे विचार होते. याकरिता महात्मा फुलेंनी शिक्षणाशिवाय स्त्री सबलहोणार नाही हे ओळखून स्त्रीशिक्षणाचा पाया रचलाआणित्यांनीस्त्री शिक्षणाकरिता १८४८साली पुण्यात पहिली शाळा काढली आणि स्वता:च्या पत्नीला सावित्रीबाई फुलेंना स्त्री शिक्षिका म्हणून शाळेत नेमले.

**स्त्री शिक्षण**

राजर्षी शाहू महाराजांनी १८८२ साली स्त्री शिक्षिका करिता अध्यापक विद्यालय स्थापन केले. कृणाबाई केळवळकर या विद्यार्थिनीला वैद्यकीयशिक्षणासाठी ग्रँड मेडिकल कॉलेजमध्ये मुंबई येथेपाठवले. त्यानंतर त्यांना उच्च शिक्षणासाठीशिष्यवृत्ती देऊन इंलंडमध्ये पुढील वैद्यकीयशिक्षण घेण्यासाठी पाठवले. १९०० क्षुद्रातील क्षुद्रमुलींकरीत स्वतंत्र शाळा काढून त्या शाळांना ९६रुपयांची मदत केली. आपल्या संस्थानातील स्त्रियांना स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन स्वत:च्या सुनेला शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. राजाराम कॉलेजमधील मुलींना फी माफ केली. शाहूंनी शिक्षणाचा क्रांतिकारक कार्यक्रम हाती घेऊन स्त्री सबलीकरणाचे कार्य केले. स्त्री शिक्षण विषयक महाराजांची दुरदृष्टीहोती, स्त्री पुरुष समानता आणण्याकरिता स्त्रियांचे शिक्षण सुरू केले पाहिजे असे त्यांना वाटत असे. स्त्रियांना चांगले-वाईट, योय-अयोग्य समजण्याकरिता शिक्षणाची गरज आहे. यामुळे शिक्षण हे समाज बदलाचे महत्वाचे साधन आहे.शिक्षणदेणे गरजेचे आहे हे ओळखून त्याकरिता शाहू महाराजांनी,समाजात शिक्षणमिळवण्यासाठी समाजाला वाटेल ती किंमतदेण्यास तयार असले पाहिजे असे धोरण ठरविले होते. पुरुषांबरोबर स्त्रियांना समान हक्क प्राप्त करण्याकरिता असले पाहिजे असे मत व्यक्त करून शिक्षणातून सबलीकरण झाले पाहिजे अशी चिकित्सक दृष्टी दिसून येते. त्याचप्रमाणे स्त्रियांना कला कौशल्याच्या शिक्षणाचा विचार केला. पुरुषाइतके स्त्रियांनाही शिक्षणघेता यावे ही शाहू महाराजांची इच्छा होती.

**आंतरजातीय विवाह कायदा**

२० मे १९२० रोजी महाराजांनी नागपूर येथे केलेल्या भाषणामध्येम्हटले आहे की,आंतरजातीय विवाह हा सामाजिक समता व एकता यांच्याकडे जाण्याची पायरी आहे. पण समाजाने या उद्घोषणेकडे दुर्लक्ष केले. तद्नंतर छत्रपती शाहूंनी इ. स. १९१९ मध्ये विठ्ठल भाई पटेल यांच्या आंतरजातीय विवाह बिलास पाठींबा देऊन हा कायदा संस्थानापुरता 'कोल्हापूर इलाख्यातील विवाह संबंधी कायदा' या नावाने गॅझेट मध्ये प्रसिद्ध केला. या कायद्याने हिंदू व जैन या दोन धर्माच्या लोकांनी जातीभेद न पाळताकोणत्याहीधर्माच्या मनुष्याची विवाह करण्याची मुभा दिली गेली,या कायद्यातील मूलतत्वास अनुसरुन जातीभेद नाहीसा करण्याचा प्रयत्न महाराज करीत होते.विवाहातून निर्माण होणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार कायद्याच्या चौकटीत ठेवूनसोडविण्याचा प्रयत्न केला. या कायद्याच्या अनुषंगाने विवाहाची नोंद सरकारी दप्तरात झाल्याने स्त्रीचे विवाहाचे वय १४ व पुरुषाचेविवाहाचे १८ असले पाहिजे असा निर्बंध घालण्यात आला,त्यावेळी हा कायदा पुरोगामी म्हणण्यास हरकत नाही. या कायद्यान्वये स्त्रीला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देणारा कायदा स्त्रीसबलीकरणासाठीमहत्वाचे म्हणावे लागेल.त्याचप्रमाणे या कायद्यानुसार विवाहाची रितसर नोंद करण्याची पध्दतसुरु झाली.हा कायदा म्हणजे स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा होय, असे महाराजांनी दाखवून दिले आणिस्त्री सबलीकरणास योगदान दिले असे म्हणण्यास हरकत नाही.

**विधवा पुनर्विवाह कायदा**

भारतीय समाजामध्येधार्मिक आणि संस्कृतीक दृष्ट्या विचार केला तर,स्त्रियांचे विधवत्व हे तीव्र भेदभावाचे व

पितृसत्ताक विचारसरणीचा एक भाग होता. शाहू महाराजांना विधवांचे गंभीर रुप हेकलंक वाटत होते. स्त्रियांवरचा विधवेचा कलंक हा कायदयान्वये दूर करणे गरजेचे आहे हे ओळखले आणि त्यांनी १९२७ मध्ये आपल्या संस्थानात वेगवेगळे विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. या कायद्यानुसार विवाहाची कायदेशीर नोंद करण्यात आली. त्यामुळे विवाहविधीचा कायदेशीर पुरावा अस्तित्वात आला.स्त्री वर्गावर होणाऱ्या अन्यायाचाप्रतिकार करण्याचा कायदा हे एक साधन म्हणून उदयास आले. त्यामुळेपुनर्विवाह कायदा हा स्त्री सबलीकरणास हातभार लावणारा आणिस्त्रियांच्यामध्ये जागृती निर्माण करणारा कायदा होय.

**स्त्रीअत्याचार प्रतिबंध कायदा**

महाराजांनी स्त्री-पुरुष समानता आणण्याकरिता आणि सामाजिक सुधारणा करण्याकरिता स्त्री अत्याचार वर्तनास प्रतिबंध करणारा वैशिष्ट्यपूर्ण आणि अभूतपूर्वअसणारा कायदा १९१९ मध्ये कोल्हापूर सरकारच्या गॅजेटमध्येअंमलात आणला. कुटुंबातील नवरा व इतर लोकांकडून होणारा छळ हा क्रूर होता.शारिरीक व मानसिकछळ हे कायदयाने थांबवले पाहिजे याकरिता त्यांनी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचा बारकाईने विचार केला. कायद्याच्या उद्देश स्पष्ट करून मागासलेल्या लोकांमध्ये सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे काम या कायद्यानुसार होईल, असे त्यांचे मत होते. त्यांनी एकूण ११ कलमे या कायदयान्वयेस्त्रीवर अत्याचार करणाऱ्या व्यक्तिस सहा महिन्यांचा कारावास व दोनशे रुपये दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद केली. या कायद्याचेप्रतिबिंब पाहिले तर, आज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ म्हंटले जाऊ शकते. या कायद्यानुसार आज स्त्रिया हिंसाचारापासून आपले संरक्षण करतात हे आज शाहू महाराजांच्या कार्याचा ठसा सर्वसमावेशक आहे असे दिसून येते.

**घटस्फोटाचा व वारसा हक्काचा कायदा**

महाराजांनी घटस्फोटासंबंधीचा कायदा हा स्त्रियांच्या हक्काचेसंरक्षणकसे करता येईल याकडे लक्ष दिले. अनेक समाजात घटस्फोटासंबंधितजातपंचायतीचे कायदे होते. यानुसार विवाह, परंपरा, रितीरिवाज या चौकटीत ठेवूनजातपंचायतती नुसार पुरुषांना अनुकूल आणि स्त्रियांना प्रतिकूल असे होते. जातपंचायत जो निर्णय देईल तोच निर्णय त्यावेळी स्त्रियांना मान्य करावा लागत असे. यामध्येजातीप्रथामहत्त्वाच्या होत्या. त्या त्याजातीतील पुरुष त्यांच्या लहरीनुसार रुढी परंपरा स्त्रियांवर लादत होते व त्यानुसार निर्णय देत होते. त्यापद्धतीने घटस्फोटित स्त्रियांवर अन्याय होत असे. होणाऱ्याअन्यायाला आळा घालण्यासाठी महाराजांनी घटस्फोटित कायदा आणून स्त्रीहक्कामध्ये कलमानुसारसुसूत्रता आणली. जर त्या स्त्रीला वैवाहिक संतती असेल तर त्याचा ताबा, पोटगी व शिक्षणाची व्यवस्था कायद्याने असावी असा आदेश काढला. स्त्रियांना जातपंचायतीने दिलेलाघटस्फोट हा स्त्रीवर अन्यायकारक आहे हे ओळखूनस्त्री एक मानव असून तिला नैसर्गिक हक्क आहेत. या हक्काचा पाया त्यांनी कायद्याच्या रूपात आणून स्त्री ही अबला नाही तर, सबल आहे दाखवून दिले. स्त्रियांच्या घटस्फोटित कायद्याबरोबर करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये १९२० मध्ये हिंदू वारसा कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा करुन सामाजिक सुधारणेचा पाया रचला. सर्व वर्णाच्या संततींना जन्मदात्या बापाच्या संतती वारसा हक्क दिला. हाच कायदा स्त्री सबलीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

**देवदासी प्रतिबंधक कायदा**

अनिष्ठ प्रथेनुसार स्त्रिया ह्या समाजात उपेक्षित आणि मागासलेल्या होत्या. पुरुषधान संस्कृतीआणि रूढी परंपरेनुसार स्त्रीचे जीवन असहाय्य होते. स्त्री ही कनिष्ठ आहे. वर्णव्यवस्थेनुसार पाहिले तर,कनिष्ठ वर्गातील मुलींना अनिष्ठ प्रथा हे प्रमाण मानून देवाला सोडण्याची प्रथा होती.त्या देवदासी, जोगीण,मुरळी या नावाने ओळखल्या जात होत्या. ही घृणास्पद पद्धती अनैतिक गोष्टी घडवत होती हे महाराजांना मान्य नव्हते. ही प्रथा बंदकरण्याकरिता देवदासी प्रतिबंध कायदा आणला. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यावर त्यांनी शिक्षेची तरतूद केली.

या स्त्रियांचे समाजातील अस्तित्व म्हणजे स्वत:चा चेहरा नसलेली स्त्री म्हणून ओळखली जात होती. आज देवदासी प्रतिबंध कायदा तीव्र असला तरी, काही समाजात आजही कनिष्ठ वर्गातील मुलींना देवाला सोडले जाते.

**सारांश**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली असली तरी, स्त्री समस्यांच्या संदर्भात म्हणावे तितके समाधानकारक चित्र दिसून येत नाही. आजही स्त्रिया कायद्याचा आधार घेऊन स्वतःचे हक्क प्राप्त करत असल्या तरीही तिच्यावर अन्याय व अत्याचारहोत आहेत. शाहू महाराजांनी स्त्री मुक्ती ही कायद्यानुसार केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेमध्ये स्त्रियांना समानतेचे हक्क व अधिकार दिले. पण आजही स्त्रियांच्या कायद्यात्मक हक्काची पायमल्ली होत आहे. आज मुलगी आंतरजातीय विवाह करीत असेल तर,तिची हत्या होते. विधवास्त्रिया पुनर्विवाह कायद्यानुसार विवाह करत असेल तर तिला

आज जातपंचायत आणि समाज मान्यता दिली जात नाही किंवा तिच्या कुटुंबावर बहिष्कार टाकला जातो. काही समाजातील स्त्रियांना घटस्फोट दिल्यानंतर संपत्तीतील हक्क यापासून वंचित केले जाते किंवा वेगवेगळ्या मार्गाने अत्याचार केला जातो. आज स्त्रिया लोकशाही तत्वाचा स्वीकार करून सबल झाली आहे हे जरी खरे असले तरी स्त्रियांच्या बाबतीत समतेचा न्यायचा अभाव आजही दिसून येत आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. पवार जयसिंगराव, लठ्ठेआण्णासाहेबश्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. घोडेश्वर प्रवीण, २०१६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन प्रश्न, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

३.जयसिंगराव पवार, राजर्षि शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी. कोल्हापूर.

४. कॉं. गोविंद पानसरे, १९९७, राजर्षि शाहू  वसा आणि वारसा, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी.

५. समाज प्रबोधन पत्रिका, जानेवारी-मार्च २०१४,

६. आढाव विलास, गुप्ता पी. व्ही.२०२०, वंचित घटक सक्षमीकरणाची रचनात्मक दिशा, शब्दवैभव प्रकाशन, जळगांव.

७. जयसिंगराव पवार, २००१, राजर्षि शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

८. जाधव रमेश,२००५, लोकराजाशाहूधत्रपती, सुरेश एजन्सी, कोल्हापूर.

९. गोटे- गव्हाणे शुभांगी, २००३, स्त्री परिवर्तनाची आव्हाने, साउथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद.

१०. ओरडो व्हा. एल आणि कांबळे नारायण, २०२१, परिवर्तनवादीविचारप्रवाह,भारती मुद्रणालय, कोल्हापूर.

११ साने गीता, १९८६, भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशन, मुंबई.